(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)
NAVJYOT / Vol. XII / Issue – IV ISSN 2277-8063

# भारतातील आधुनिक स्त्री चित्रकार व त्याचे चित्रकला क्षेत्रातील योगदान

**श्री संतोष बाबासो पाटील.** संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
Email- patilsb19@gmail.com

---

**प्रस्तावना –** आधुनिक युगात सर्वच क्षेत्रात पुरुषाच्या बरोबरीने स्त्रीयांनीही आपले प्रभुत्व सिद्ध केले आहे. आपल्या प्रतिभेच्या जोरावर स्त्रीया अनेक क्षेत्रात ठसा उमटवत आहेत. स्त्रीया विविध क्षेत्रात पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. यामध्ये चित्रकला क्षेत्रात ही स्त्रीयांची कार्य झालेले दिसून येते. सद्या स्त्रीयांची कलाक्षेत्रातील शिक्षण घेण्याची संधीही वाढत आहे. अनेक क्षेत्रात काम करणारी स्त्री पूर्वीच्या काळी फक्त कला अस्थापना किंवा फ्रीलान्सिंग हे पर्याय उपलब्ध असताना सद्या मात्र फाइन आर्टस्, ॲनिमेशन, इंटेरियर डिझाइन यासारख्या नवीन क्षेत्रांकडे वळलेली दिसून येते. आधुनिक युगात स्त्री चित्रकर्तींची कामगिरी उंचावलेली दिसून येते. राधा आंबेकर, ज्योत्स्ना कदम, प्राजक्त पालव, रुपाली गट्टी, परबीबेन यासारख्या आधुनिक स्त्री चित्रकर्तीनी आपल्या कामाचा ठसा भारतभर उतरवला आहे. उपयोजित कलेची पदवी घेतलेल्या अनेक स्त्री चित्रकारांनी चित्रकला क्षेत्रात अत्यंत उत्कृष्ठ काम केलेले दिसून येते. गिरणी कामगारांचा संप, रोटी कपडा और मकान अशा विषयावर स्त्री चित्रकारांनी मांडणी केलेली आहे. म्हणजेच प्रस्थापित विषयांना छेद देवून वेगळी मांडणी करण्याचे कार्य यांनी केले आहे. कोरोनाच्या काळात नवीन माध्यमांचा वापर करुन निर्माण केलेली कृती सोशल मिडियाच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य अनेक स्त्री चित्रकारांनी केलेले दिसून येते. अनेक चित्रकर्तींच्या चित्रनिर्मितीचे विषम सामाजिक प्रश्न, घटना दिसून येतात. या संदर्भात ॲक्टिव्हिस्ट २०२० या (मानगाव जि.रायगड) प्रदर्शनातील पुण्याच्या वैशाली ओक यांच्या दोन कलाकृतींचा उल्लेख करता येईल. गिरणी कामगारांचा संप या घटनेवरील रोटी कपडा और मकान ही कलाकृती त्या नेहमी वापरत असलेल्या कापड या माध्यमातून त्यांनी साकारली होती. त्यांची दुसरी कलाकृती 'आमु आखा एक से' ही नर्मदा बचाव आंदोलनानंतर आधारित होती. अशा समाजातील विविध सामाजिक प्रश्नावर स्त्री चित्रकर्ती सद्या व्यक्त होताना दिसते. अशाच भारतातील आधुनिक स्त्री चित्रकारांच्या कार्याचा आणि चित्रशैलीचा आढावा प्रस्तुत संशोधन लेखामध्ये घेण्यात आलेला आहे.

**उद्दिष्ट्ये –**

१) आधुनिक स्त्री चित्रकारांच्या चित्रशैलीचा अभ्यास करणे.
२) आधुनिक स्त्री चित्रकारांनी निर्माण केलेल्या कलाक्षेत्रातील विविध कलाकृतींचा अभ्यास करणे.
३) आधुनिक स्त्री चित्रकारांच्या कार्याचा सामाजिक दृष्टीकोनातून अभ्यासणे.
४) आधुनिक स्त्री चित्रकारांचे चित्रकला क्षेत्रातील योगदान अभ्यासणे.

**गृहीतके –**

१) भारतीय चित्रशिल्पकलेत स्त्री चित्रकारांचा प्रवेश खुप उशीरा झालेला आहे.
२) भारतीय चित्रकला क्षेत्रात स्त्री कलावंतांची संख्या अत्यल्प आहे.
३) स्त्रीयांचे भावविश्व स्त्री चित्रकारांच्या नजरेतून कमी आणि पुरुष चित्रकारांच्या नजरेतून रंगवली आहे.

**संशोधन पद्धती** – प्रस्तुत संशोधनपर लेखासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर केला असून स्त्री चित्रकारांच्या वास्तविक वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन मांडले आहे. काही स्त्री चित्रकारांच्या मुलाखती घेवून माहिती व तथ्य संकलन केलेले आहे.

**भारतातील स्त्री चित्रकारांच्या चित्रकला क्षेत्रातील कार्यांचा ऐतिहासिक आढावा –** भारतीय चित्रकला क्षेत्राच्या इतिहास पाहिल्यास त्यामध्ये स्त्री कलावंताची संख्या अत्यल्प दिसते. परंतु ज्या काही स्त्री कलावंत आहेत, त्यांनी प्रतिभा आणि सर्जनशीलतेच्या बळावर दृश्यकलाक्षेत्रात ओळख निर्माण केली आहे. इतिहासामध्ये पाहिल्यास स्त्रीया अनेक चित्रांचा आणि शिल्पांचा विषय बनल्या. जगभरातल्या दृश्यकलेत स्त्री सौंदर्याची अनेक रुपे रंगवलेली दिसतात. स्त्री देहाची अनेकविध रुपे कलावंतांनी साकारली आहेत. पण ही चित्रे पुरुषांच्या सौंदर्य विषयक नजरेतून रंगवली गेली. स्त्रीयांचे भावविश्व हे स्त्री च्या नजरेतून कमी आणि पुरुषाच्या नजरेतून अधिक उतरले गेले. या सर्व गोष्टीवर न्युयॉर्क मध्ये १९८५ साली स्थापन झालेल्या गुरेल्ला गर्ल्स या स्त्रीवादी चळवळीचे आवाज उठवला.

पाश्चात्य कलाजगतात मेरी कसाट, फ्रिडा काहलो, मिशेल यासारख्या स्त्री चित्रकारांनी स्वत:ची वेगळी वाट निर्माण केली. मेरी कसाट यांच्या कलाकृतीतील निखळ स्त्री सौंदर्याची व्यक्तिचित्रे मोहवून टाकतात. कलाक्षेत्रात अत्यंत वादळी ठरलेल्या मोक्सिकन स्त्री चित्रकार फ्रिडा काहलो यांची चित्रशैली अप्रतिम होती. त्यांनी अनेक सेल्फ पोर्टेटमधून स्वत:ला शोधायचा प्रयत्न केलेला दिसून येतो. त्यांच्या चित्रात अतिवास्तववाद होता. 'भारतीय चित्रकलेत स्त्री

चित्रकारांचा प्रवेश जरा उशीराच झाला. स्त्री चित्रकार म्हणून नव्हे तर चित्रकार म्हणून कला जगतात प्रसिद्ध असलेल्या आणि भारतीय चित्रकलेला खऱ्या अर्थाने आधुनिक चेहरा देणाऱ्या आमृता शेरगील भारतीय कलाक्षेत्रातील फ्रिडा काहलो समजल्या जातात. २८ वर्षे आयुष्य लाभलेल्या शेरगील यांच्या चित्राचा विषयही त्यांच्या चित्राइतकाच नितळ, पारदर्शी होता. हंगेरियन आई आणि भारतीय शीख पीता असणाऱ्या अमृता यांचा जन्म हंगेरीच्या बुडापेस्टला झाला. अमृता १६ वर्षाची असताना कलाशिक्षणासाठी पॅरिसला रवाना झाली. पुन्हा वयाच्या २१ व्या वर्षी भारतात आली. भारतात आल्यानंतर त्यांनी आजंठा, राजस्थानी कलाशैलींचा अभ्यास केला. ग्रामीण भारतातील स्त्रीचं जीवन अभ्यासून ते चित्रात उतरवलं. अत्यंत संवेदनशीलतेने रेखाटलेली ही चित्रे भारतीय आधुनिक चित्रकलेला एक वेगळी दिशा देतात. अमृता शेरगील भारतात येण्यापूर्वी म्हणजे १८५७ साली भारतात सर जे जे स्कूल ऑफ आर्टची स्थापना झाली. परंतु या स्कूलमध्ये स्त्रीयांचा प्रवेश १८९० च्या दशकात सुरु झाला. जे.जे. स्कूल मध्ये सुरुवातीच्या काळात उच्चभ्रू कुटुंबातील स्त्रीया कलाशिक्षण घेत. मात्र नंतरच्या काळात मध्यमवर्गीय स्त्रीया जे.जे. स्कूल ऑफ आर्ट मध्ये प्रवेश घेवू लागल्या. यामध्ये अँजेलो ॲटिनिओ त्रिंदाद, अंबिका धुरंधर नावे ठळकपणे पुढे येतात. १८७१ मध्ये कोलकत्ता येथे २५ विवाहित बंगाली स्त्री चित्रकारांचे प्रदर्शन झाल्याची नोंद आहे. भारतीय दृश्यकलेचा इतिहास आणि वर्तमाने अशा अनेक स्त्री चित्रकारांनी पुढे समृद्ध केला. बी प्रभा, नालिनी मलानी, अपर्णा कोरे, अंजली मेनन, ललिता लाजमी, प्रफुल्ला डहाणूकर, अंगू दोडिया, अनुपमा सुद अशी अनेक नावे सांगता येतील.

**सन २०१० ते २०२० दरम्यानच्या चित्रकला क्षेत्रातील स्त्रीयांची कामगिरी –** कोणत्याही कलेतील स्थित्यंतरण ही तत्कालीन ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीनुसार घडत असतात. गेल्या देशकातील म्हणजे २०१० ते २०२० दरम्यानच्या स्त्री चित्रकारांच्या कामगिरीबाबत व्यापक आढावा घेता येईल. अलीकडील काळातील या स्त्री चित्रकारांचे काम खूप बदलेलं दिसून येते. त्यांची कलादृष्टीही बदललेली दिसून येते. सुंदर स्त्रीयांची चित्र, सुंदर निसर्गदृश्य, कायम मनाला आनंद देणारे विषय या चौकटीतून बाहेर पडून गेल्या दशकातील स्त्री चित्रकारांनी सामाजिक समस्या, सामाजिक प्रश्न सोडवण्यासाठी चित्रनिर्मिती केलेली दिसून येते. गेल्या दशकाचा विचार करता चित्रकला क्षेत्रात नवीन दालने निर्माण झाली आहेत. साधारण ३०–३५ वर्षापूर्वी कलेतील पदविका घेतल्यानंतर स्त्रीयांपुढे कलाअध्यापन किंवा प्रदर्शन हे पर्याय असायचे हळूहळू त्यामध्ये बदल घडत गेला. सद्या डिजिटल तंत्रज्ञानामुळे त्या गरज असेल तेव्हा घरात बसून काम करु शकतात. तसेच स्वत:चा व्यवसाय ही करु शकतात. रेखा आणि रंगकला याबरोबर कॅलिग्राफी, फोटोग्राफी, क्युरेशन, इंटेरिअर डिझायनिंग टेक्साटाइल डिझाइनिंग, कला विषयक लेखन–संशोधन या अशा कित्येक क्षेत्रात सद्या स्त्री चित्रकार वावरताना दिसतात. पूर्वीच्या तुलनेत गेल्या दशकात कलामहाविद्यालयातील विद्यार्थिनींची संख्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक दिसू लागली आहे. १५ वर्षापूर्वी स्त्री चित्रकारामध्ये फ्री लॉन्सिंगकडे ओढा होता सद्या फाइन आर्टकडे ओढा वाढलेला आहे. जगापुढे आपली कला मांडताना फाइन आर्टिस्ट म्हणून स्वत:ची प्रतिमा निर्माण करायची, हे एकच ध्येय या क्षेत्रात येणाऱ्या तरुणीसमोर गेल्या दशकात दिसून येते. तसेच या स्त्री चित्रकार न्यूड सेल्फ पोर्टेटचं प्रदर्शन भरवण्याच धाडसही करतात. यामध्ये नाशिकच्या मानसी सागर या स्त्री चित्रकाराने 'न्यूड' चित्र प्रदर्शनाची संकल्पना प्रत्यक्षात आणली. उषा पाठक या अमेरिका स्त्री चित्रकर्तीने जगभरातील महत्त्वाच्या व्यक्तींची काढलेली पोर्टेटस् गाजली आहेत. त्यांच्यामागे गेल्या दशकातील समाजमाध्यमांचा वाढता प्रभाव कलाकरांसाठी बऱ्याच अंशी वरदान ठरला आहे. आर्ट गॅलरीच्या उपलब्धतेची वाट न बघता 'इस्टांग्राम' फेसबुकद्वारे एक नव व्यासपीठ त्यांना मिळालं आहे. घरबसल्या जगभरातील म्युझियम्स यांची ओळख आणि अभ्यास दोन्ही सोयीचं झाल आहे. परंतु रसिक आणि कलावंत यांचा प्रत्यक्ष संपर्क संपुष्टात आला आहे. या दशकात स्त्री कलाकार आपल्या स्त्रीत्वाचा अभिमान बाळगत आणि स्त्री–पुरुष भेदाला छेद देत स्त्रीवादावर आणि स्त्री शक्ती कलाकृतींतून मुख्यत्वे भाष्य करताना दिसले.

सर्जनाचा अनुभव असलेल्या, चित्रकला क्षेत्रातील चित्रकर्ती लेखन, कलाविषयक संशोधन, अर्काइव्ह (कलाजतन) अशा नव्या क्षेत्रांत प्रामाणिकपणे, गांभीर्यानं काम करत आहेत. 'एशियाटिक सोसायटी' च्या 'रजनी दांडेकर फेलोशिप' च्या अंतर्गत २०१७ मध्ये 'बॉम्बे स्कूल परंपरेतील स्त्री चित्रकार' या विषयावर साधना बहुलकर यांनी संशोधन केलं होतं, तर २०१८ मध्ये राधा आंबेकर यांनी 'मुखपृष्ठेः एक अभिजात चिंतन' या विषयावर संशोधन केलं. सांस्कृतिक मंत्रालयाच्या फेलोशिप अंतर्गत तर अनेक चित्रकर्तीनी प्रकल्प सादर केले आहेत. माणिक वालावलकर या २०१५ पासून 'महाराष्ट्रातील चित्रकथी मलोकपरंपरे' वर संशोधन करत आहेत. ज्येष्ठ चित्रकर्ती ज्योत्स्ना कदम यांच्या २०१० मध्ये प्रकाशित झालेल्या 'सर आणि मी' या आत्मचरित्रास 'महाराष्ट्र राज्य पुरस्कारा' सहित एकूण पाच पुरस्कार प्राप्त झाले आहेत.'अर्काइव्ह' या चित्रकलेशी संबंधित दालनासंबंधी विचार करताना स्वाती गोसावी सावंत या तरुण चित्रकर्तीचा उल्लेख करणं आवश्यक वाटतं.'जे. जे. स्कूल ऑफ आर्ट' मधून पदवी घेतल्यावर 'सौंदर्यशास्त्र' विषयात त्यांनी पदव्युत्तर

शिक्षण घेतलं. भारतीय विद्याशास्त्राचाही (इंडॉलॉजी) अभ्यास करून त्यांनी चित्रकार अकबर पदमसी यांच्या 'मार्ग' प्रकाशनाच्या पुस्तकासाठी सहाय्यक म्हणून काम पाहिलं. भारतीय नौदलाच्या संशोधनाच्या कामात त्या सहाय्यक तज्ज्ञ मार्गदर्शक आहेत.

गेल्या दशकात चित्रकर्तींच्या कलानिर्मितीचे विषय सामाजिक प्रश्न, घटना, असे दिसून येतात. या संदर्भात 'ॲक्टिव्हिस्टा २०२०' या (माणगाव, जिल्हा रायगड) प्रदर्शनातील पुण्याच्या वैशाली ओक यांच्या दोन कलाकृतींचा उल्लेख करता येईल. 'गिरणी कामगारांचा संप' या घटनेवरील 'रोटी कपडा और मकान' ही कलाकृती त्या नेहमी वापरत असलेल्या कापड या माध्यमातून त्यांनी साकारली होती. त्यांची दुसरी कलाकृती 'आमु आखा एक से' ही नर्मदा बचाव आंदोलनावर आधारित होती. बंगळूरुमधील चित्रकला परिषदेतून शिल्पकलेची पदवी घेतलेल्या शामला नंदीश गेल्या ३० वर्षांपासून 'पाणी' या विषयावर मांडणीशिल्प निर्माण करत आहेत. बंगळूरुमधील जलाशयाच्या वाईट अवस्थेकडे सर्वसामान्य लोकांचं लक्ष वेधण्यासाठी त्यांनी अनेक तरंगती शिल्प जलाशयात मांडली. अनेक वर्ष जलविषयक संदेश पोहोचवताना त्या नित्य नवीन कलाकृती निर्माण करताना दिसतात. मुंबईच्या प्राजक्ता पालव अहिर पोर्ट्रेट या विषयात

'जे.जे.स्कूल ऑफ आर्ट' मधून पदव्युत्तर शिक्षण घेऊन एका वेगळ्या विषयावर चित्रनिर्मिती करतात. घरातले कोपरे, अडगळीच्या जागा, या विषयावर आणि आता शहरातील कोपरे (कॉर्नर्स ऑफ द सिटी) या विषयातून त्या जणू शहराचं व्यक्तिचित्र (पोर्ट्रेट) साकारतात. 'कोकणनगर' ही मुंबईतील भांडुपमधील वस्ती कोकणातून आलेल्या माणसांनी वसलेली. प्राजक्तानं त्याची काही चित्रं तयार केली. भिंतीवरील खिळ्यावर लटकवलेल्या डब्यात लावलेली तुळस हे त्यातील एक साधं, सुंदर चित्र. तिथल्या मुलांनाही त्यांनी चित्र काढण्यास प्रवृत्त केलं. वास्तुशिल्पशास्त्राच्या विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेतलं. या चित्रांचं प्रदर्शन बांबू बांधून त्यावर चित्रं लटकवून मांडण्यात आलं. कधीही कलादालनात न गेलेल्या तेथील लोकांना चित्रप्रदर्शनाचा आनंद त्यांनी दिला. याशिवाय कोकणातील धामापूर तलाव या गावातील मुलांसाठी गेली दहा वर्षं त्या एक प्रकल्प करत आहेत. कोकणातील 'दशावतार' या पारंपरिक कलेची जपणूक व्हावी, तसंच ॲनिमेशन' सारख्या नव्या क्षेत्रांची ओळख व्हावी, या दृष्टीनं त्यांचं काम सुरू आहे.

ॲनिमेशनच्या क्षेत्रात गेल्या दशकात नवीन तंत्र आली आहेत. उपयोजित कलेची पदवी घेतलेल्या अनेक तरुण स्त्री चित्रकार यात खूप चांगलं काम करत आहेत. रुपाली गट्टी या सुलेखनकार आणि ॲनिमेशनच्या क्षेत्रात 'प्रॉडक्ट डिझायनर' आहेत. पार्श्वभूमी चित्रण करण्यापासून प्रारंभ केलेल्या रूपाली जवळजवळ तेवीस वर्षे या क्षेत्रात आहेत. 'आपल्याकडे ॲनिमेशन म्हणजे कार्टून फिल्म' अशी एक गैरसमजूत आहे. पण ॲनिमेशन हे एक माध्यम आहे,'असं रूपाली आवर्जून सांगतात. 'बाहुबली-१' आणि 'बाहुबली-२' या चित्रपटांत त्यांनी 'कॉन्सेप्ट आर्टिस्ट' म्हणून त्यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली आहे. कॅनडा, रशिया, चीन, दोहा, 'यूएई' मध्ये (संयुक्त अरब अमिराती) अम्युझमेंट पार्कमधील राइड फिल्म्ससाठी त्यांनी डिझायनर म्हणून काम केलं आहे. या वर्षी ऑस्कर पुरस्कारांसाठीच्या पहिल्या सोळा फिल्म्समध्ये 'बॉम्बे रोझ' या चित्रपटाची निवड झाली. या फिल्मचं 'प्रॉडक्शन डिझाइन' रूपाली गट्टी यांचं आहे. रूपालींच्या मते, 'महाराष्ट्रात अनेक उत्तम काम करणारे तरुण चित्रकार आहेत. निमेशन क्षेत्रात दिवसेंदिवस नवीन तंत्रांची भर पडत आहे. या विषयाचं शिक्षण देणारी अजूनही एकही सरकारी संस्था नसल्याने खेडोपाडीच्या तरुणांना भरमसाठ फी भरावी लागते. जमीन विकून शिक्षण घेण्यासाठी काही तरुण गावाहून येतात ही सत्य परिस्थिती आहे.'गीतांजली राव यांच्यावर स्वतंत्र लेख होईल एवढं यश गेल्या दशकात त्यांनी मिळवलं आहे. या सत्यदेव दुबे यांच्या शिष्या व जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधील सुवर्णपदकविजेत्या कलाकार. २०१४ मध्ये 'टू लव्ह स्टोरी' या त्यांच्या लघुचित्रपटाची 'कान्स क्रिटिक वीक' स्पर्धेत निवड झाली. 'बॉंबे रोझ'(२०१९) या ॲनिमेटेड चित्रपटासाठी त्यांनी लेखिका-दिग्दर्शिका म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. स्वित्झरलॅंडमधील लोकान येथील चित्रपट महोत्सवात त्यांचा अलिकडचा लघुचित्रपट 'टुमॉरो माय लव्ह' प्रारंभी दाखवण्यात आला.

शहरातल्या 'आर्ट स्कूल' मधून पदवी घेतलेल्या स्त्री चित्रकर्तीप्रमाणेच खेडोपाडीच्या, जंगलात वास्तव्य करणाऱ्या लोककला चित्रकर्तींनीही गेल्या दशकात खूप काही कमावलं आहे. कच्छच्या रबारी भरतकामाच्या पारंपरिक कलेमधून पाबीबेन या चित्रकर्तीनं स्वतःचा 'पाबीबेन डॉट कॉम' हा ब्रँड जगभर प्रसिद्ध केला आहे. बैगा चित्रकर्ती जुधइयाबाईच्या चित्रांचं पॅरिसमध्ये प्रदर्शन भरलं होतं. भूरीबाई, दुर्गाबाई या गोंड चित्रकर्तींची कामगिरी वाखाणण्याजोगी आहे. मधुबनी आणि इतर पारंपरिक कलांमधील अनेक चित्रकर्तींचा 'पद्मश्री' पुरस्कारानं सन्मान झाला आहे.

'ललित कला अकादमी' नं खास स्त्री चित्रकारांसाठी आयोजित केलेल्या कार्यशाळांतून अनेक चित्रकर्तींना संधी मिळते आहे. खास लोककलाकार स्त्री चित्रकारांच्या कार्यशाळा हा नव्यानं सुरू झालेला उपक्रम. सुप्रसिद्ध शिल्पकार आणि ललित कला अकादमीचे अध्यक्ष उत्तम पाचारणे यांनी पदभार हाती घेतल्यानंतर लक्षणीय संख्येनं चित्र,

NAVJYOT / Vol. XII / Issue – IV ISSN 2277-8063

शिल्पकलेच्या कार्यशाळा घेतल्या. लोककला चित्रकर्ती व पारंपरिक चित्रकर्तीसाठी कार्यशाळा उपक्रम नव्याने सुरू करण्यात आला. आदिवासी चित्रकर्तींनासुद्धा उत्तम चित्रनिर्मितीचा आनंद तर मिळतोच, पण अकादमीतर्फे प्रवास, खर्च, उत्तम राहण्याची व्यवस्था आणि मानधन देऊन त्यांचा सत्कार केला जातो. आशियातील सर्वांत मोठा कलामहोत्सव म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'कालाघोडा फेस्टिव्हल' चं यंदाचं २२ वं वर्ष असून हा महोत्सव सातत्यानं, यशस्वीपणे घडवणाऱ्या अनेक सर्जनशील स्त्रियाच आहेत. विशेष म्हणजे खेडोपाडीच्या स्त्री कलाकारांना त्या एक चांगलं व्यासपीठ मिळवून देतात.

'कोची बिनाले २०१८'चं क्युरेशन अनिता दुबे या चित्रकर्तीनं केलं आणि हा कलामहोत्सव एका वेगळ्या पातळीवर नेऊन ठेवला. लोकचित्रकर्ती दुर्गाबाई व्याम यांचं नजरेत भरणारं काम प्रवेश केल्या केल्याच दिसेल अशी योजना तिथे होती. श्रद्धेनं एखादं काम करणं हे निर्मितीक्षम स्त्री चित्रकार करू शकते, याचं हे गेल्या दशकातील मोठं उदाहरण आहे.

गेल्या दशकातील शेवटचं वर्ष करोनाचं वर्ष होतं. चित्रकार हे नेहमी एकांतात काम करणं पसंत करत असल्यामुळे टाळेबंदीच्या काळाचा उपयोग विविध प्रयोग करून चित्रकारांनी केला. विशेष म्हणजे फक्त स्वतःच्या आनंदाकरिता, पैसे मिळवण्याकरिता आपल्या कलेचा उपयोग व्हावा, हा पूर्वीचा संकुचित दृष्टिकोन गेल्या दशकात बदललेला दिसतो. समाजातील प्रश्न, त्यावरील उपाय, या दृष्टिकोनातून कलानिर्मिती करणारी स्त्री चित्रकार, शिल्पकार, चित्रपट-निर्माती आणि कलेच्या विविध दालनांतून यशस्वी कलानिर्मिती करणारी सर्जनशील स्त्री आपल्याला दिसते. आणि हीच गेल्या दशकातील जमेची आणि अभिमानाची गोष्ट आहे.

**निष्कर्ष –**

१) आधुनिक स्त्री चित्रकारांच्या चित्रातील निसर्गरम्य दृश्ये, सुंदर स्त्री, निसर्गदृश्य किंवा मनाला आनंद देणारे विषय जावून सद्या समाजातील प्रश्न. सांस्कृतिक प्रश्नाकडे स्त्री चित्रकारांची चित्रशैली वळलेली आहे.

२) आधुनिक स्त्री चित्रकारांनी अत्यंत कष्टाने विविध क्षेत्रातील विविध विषयावर कलाकृतींची निर्मिती केलेली दिसून येते.

३) आधुनिक स्त्री चित्रकर्ती म्हणून अनेक स्त्रीयांनी नवीन विषयावर चित्ररेखाटन करुन प्रदर्शने भरवली आहेत.

४) स्त्री कलाकार आपल्या स्त्रीत्वाचा अभिमान बाळगत आणि स्त्रीपुरुष भेदाला छेद देत स्त्रीवादावर आणि स्त्रीशक्तीवर कलाकृतींतून मुख्यत्वे भाष्य करताना दिसते.

५) अनेक स्त्री कलाकारांनी फेसबुक, इंस्टाग्राम यांसारख्या सोशल माध्यमांच्या सहाय्याने आपली कला जगासमोर आणण्याचा प्रयत्न केलेला आहे.

६) स्त्री चित्रकर्तींच्या कला निर्मितीचे विषय सामाजिक, घटना प्रसंग समस्या असे असलेले दिसतात.

७) अनेक स्त्री चित्रकर्तींची कला क्षेत्रात विविध विषयावर संशोधन करुन आपले अभ्यासपूर्व विचार मांडलेले आहेत.

**संदर्भ –**

१) भारतीय कलेचा इतिहास, संध्या केतकर, ज्योत्स्ना प्रकाशन, २०१५
२) कॅनव्हास, अच्युत गोडबोले आणि दिपा देशमुख मनोविकास, प्रकानन, २०१५
३) लोकसभा, चतुरंग पुरवणी सदर, दशकथा, लेखमाला – २०२१
४) लोकराज्य मासिक, २०११ माहिती व जनसंपर्क महासंचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई
५) मैफल रंगाची लेख मालिका दै. महाराष्ट्र टाइम्स.
६) मराठी नियतकालिकातील दृश्य कला विचार, रमेशचंद्र पाटकर, ज्योत्स्ना प्रकाशन, २००९
७) महाराष्ट्र टाइम्स कला व अवकाश लेखमाला, प्रा.बाळासाहेब पाटील – २०१६
८) मैफल रंगाची लेख मालिका दै.महाराष्ट्र टाइम्स, प्रा.बाळासाहेब पाटील